लोकमत

# 'जेडीआयईटी'च्या विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपनीध्ये निवड

## 'कंट्रोल युनियन' : जगभरात कार्यक्षेत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**यवतमाळ :** येथील जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या टेक्सटाईल इंजिनिअरिंग विभागातील अंतिम वर्षाच्या दोन विद्यार्थ्यांची नेदरलँडच्या 'कंट्रोल युनियन' या बहुराष्ट्रीय कंपनीत निवड झाली आहे. यामध्ये शिवम अडोले, विनोद तेली या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

२८ ऑगस्ट रोजी घेण्यात आलेल्या ऑनलाईन कॅम्पस इंटरव्ह्यूतुन हे विद्यार्थी निवडले गेले. कंट्रोल युनियन ही कंपनी टेक्सटाईल जगतातील आंतरराष्ट्रीयस्तरावर विविध कंपनीचे गुणवत्ता परिक्षण तसेच त्यांना प्रमाणित करण्याचे काम करते. ७० हून अधिक देशात या कंपनीचा कार्यविस्तार आहे. भारतात


शिवम अडोले


विनोद तेली

१२ ठिकाणाहून काम सांभाळले जाते. कंपनीचे विविध लेबॉरेटरिजचे जाळे जगभरात पसरले आहे.

जेडीआयईटीच्या विद्यार्थ्यांसाठी कंट्रोल युनियनच्या मुंबईस्थित कार्यालयाद्वारे घेण्यात आलेल्या इंटरव्ह्यूच्या चमूमध्ये चीफ एक्झीक्युटिव्ह ऑफिसर सचिन पवार, ह्यूमन रिसोर्स मॅनेजर हरमिंदर कौर रैना यांचा समावेश होता. नामांकित कंपनीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात येत आहे.